0001

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचा दि. २२/०३/२०१३ रोजीचा अहवाल व त्यासोबत प्राप्त झालेली कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२१/२०१३/जा.२६९, दिनांक २६/०३/२०१३.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचे दिनांक १०/०४/२०१३ रोजीचे लेखी अभिवेदन.

४) एकविरा आई बोटीचे मालक श्रीमती कविता महेंद्र कोळी यांचे दिनांक १०/०४/२०१३ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२१/२०१३/जा ३३८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक :१५ / ०४/२०१३.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक १८/०३/२०१३ रोजी रात्री २१:०० वाजता सीआयएसएफच्या मुंबई पोर्ट ट्रस्ट युनिटमधील उप निरीक्षक नामे अनिल कुमार रिपाल सिंग सागरी गस्तीकामी पुरविण्यात आलेली 'तरंगिनी' या गस्ती नौकेतून स्टाफसह सागरी गस्त घालीत असताना दिनांक १९/०३/२०१३ रोजी पहाटे ०२:०० वाजण्याचे सुमारास त्यांना जवाहरद्विप येथील जेटी क्र. ४ जवळील समुद्र परिसरात एक लहान बोट संशयितरीत्या फिरत असताना आढळली. म्हणून त्यांनी सदर बोटीस थांबवून बोटीची तपासणी केली असता, त्या बोटीवर सुमारे ६० ते ७० काळ्या रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये डिझेलचा साठा आढळून आला. म्हणून त्यांनी बोटीवर हजर असलेल्या इसमाकडे त्याबाबत चौकशी केली असता, सदर डिझेलच्या साठ्याबाबत त्याचेकडे काहीही कागदपत्रे मिळून आली नाहीत. म्हणून सदर इसमास ताब्यात घेऊन त्याची बोट तरंगिनी या बोटीने टोचन करुन मुंपोट्रमधील व्हिक्टोरिया डॉक येथील केएलएम जेटी या ठिकाणी आणून उभी केली असल्याची माहिती यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांना दिल्यावरुन त्यांचेसह सदर व्हिक्टोरिया डॉक येथील केएलएम जेटीवर जावुन सदर ताब्यात घेतलेल्या बोटीची तपासणी केली. सदर

बोटीवर सीआयएसएफने ताब्यात घेतलेला इसम हजर होता. सदर इसमाकडे चौकशी केली असता, त्याने त्याचे नांव महेंद्र हरी कोळी असे असल्याचे सांगून तो मोरा गावचा रहिवाशी असल्याची त्याने माहिती दिली. तसेच त्याच्या ताब्यातील बोटीचे नाव एकविरा आई असे असल्याचे सांगून सदर बोट त्याची पत्नी सौ. कविता महेंद्र कोळी हिचे नावावर असल्याची त्याने सांगितले. सदर बोटीवर असे एकूण ६८ प्लास्टीकच्या कॅनची तपासणी केली असता, त्यामध्ये एकूण १८९० लिटर डिझेल, किं.अं. ७५,६००/- रुपये असल्याचे आढळून आले. नमूद इसमाकडे सदर डिझेल साठ्याविषयी विचारणा केली असता, त्याचेकडे त्या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे नसल्याचे आढळून आल्याने नमुद आरोपीत इसम नामे महेंद्र हरी कोळी याने त्याच्या ताब्यातील एकविरा आई या बोटीमध्ये वरीलप्रमाणे बेकायदेशिर वाहतुक करण्याकरीता अवैध डिझेलचा साठा केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर इसमास त्याचे ताब्यातील वर नमूद मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तद्नंतर दिनांक १९/०३/२०१३ रोजी ०९:४५ वाजता यलोगेट पोलिस ठाणे येथील अधिकाऱ्यांनी दोन पंचांना व्हिक्टोरिया डॉक येथील के.एल.एम. जेट्टी येथे बोलावले गुन्ह्याची थोडक्यात हकीगत समजावून सांगितली. सदर ठिकाणी पोलिसांसोबत हजर असलेले सीआयएसएफचे उप निरिक्षक अनिलकुमार यांनी पोलिसांना व पंचांना के.एल.एम. जेट्टी येथे उभी असलेलली एक बोट दाखवून सदर बोट ही ते सागरी गस्त करीत असताना संशयितरित्या डिझेलचे कॅन भरलेले मिळून आल्याने त्यांनी सांगितले. सदर बोटीमध्ये पोलिस अधिकारी व पंच यांनी जावून पाहिले असता, सदर बोटीत एक इसम उभा असून नमूद इसम हा सदर एकवीरा आई या बोटींचा चालक असल्याचे सीआयएसएफचे अधिकारी अनिलकुमार यांनी सांगितले. सदर इसमास पंचांनी त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव महेंद्र हरी कोळी, धंदा मच्छिमारी असे सांगितले. सदर माल त्याने कोठून आणला याबाबत पंचांनी त्याला विचारले असता त्याने सांगितले की, एका जहाजास मासळी दिली असता त्याचे बदल्यात त्यांनी नमूद डिझेलसारखे तेल त्याला दिले.

सदर बोटीची पडताळणी करुन पाहिली असता, ती काळ्या रंगाची असून खालच्या बाजूस तांबडा रंग दिलेला आहे. बोटीच्या मध्यभागी केबिन असून सदर केबिन ही लाकडी प्लायबोर्डने बनवलेली आहे. संपूर्ण बोट लाकडांच्या जाड फळ्यांपासून बनविण्यात आली आहे. केबिन ही ५X३ आकाराची असून तिला हिरवा रंग देण्यात आला आहे. बोटीच्या मागच्या बाजूला एकवीरा आई असे कोरलेल्या अक्षरात आहे. सदरची बोट ही दोन सिलींडरची असून लिस्टर कंपनीचे २० हॉर्स पॉवर असलेले इंजिन आहे. सदर बोटीची लांबी १६ फूट असून ती पुढील बाजूस निमूळती होत गेलेली आहे. तसेच बोटीची रुंदी ०८ फुट आहे. सदर बोटीवर एक निळ्या रंगाचा व एक पांढऱ्या रंगाचा तसेच काळ्या रंगाचे ६१ कॅन असे एकूण ६३ कॅन डिझेलसारख्या अग्निजन्य पदार्थाने भरलेले दिसून आले. पोलिसांनी सदर कॅनमधील जे रिकामे कॅन होते असे ०८ कॅन ताब्यात घेतले तसेच भरलेले कॅन ताब्यात घेऊन त्यातील कॅनमधून पाच एक लिटर आकाराच्या प्लास्टिकच्या बाटल्या भरुन ते नमुना म्हणून ताब्यात घेतले.

सदर बाटल्यांना व भरलेलल्या कॅनना सिल करुन त्यावर पंचाच्या व पोलिसांच्या सह्यांचे लेबल लावण्यात आले. तसेच सदर बोटीतून एक इंच रुंदीचा प्लास्टिकचा ३० फुट लांबीचा पाईप ताब्यात घेतला. तसेच एक पांढऱ्या रंगाचे प्लास्टीक व डबा कापून तयार करयात आलेले लोखंडी पत्र्याचे एक नरसाळे तसेच सदरची बोटी पोलिसांनी ताब्यात घेतली.

अशाप्रकारे इसम नामे महेंद्र हरी कोळी याने त्याच्या लाकडी बोटीत १८९० लिटर इतका ज्वलनशिल पदार्थ डिझलचा अवैध साठा करुन हयगयीने आपल्या कब्जात बाळगल्याने, पर्यायानी त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने सर्व संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७(२) तसेच २) भादंवि चे कलम २८५ चा भंग केल्यावरुन यलोगेट पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०९/२०१३ दिनांक १९/०३/२०१३ अन्वयें गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण अंदाजे किंमत (रुपंये) |
|---|---|---|---|
| १ | डिझेलने भरलेले ६३ प्लास्टीकचे काळे कॅनमधील डिझेल | १८९० लिटर | ७५,६००/- |
| २ | एकविरा आई नावाची लाकडी बोट | १ नग | २५,०००/- |
| ३ | काळ्या रंगाचे रिकामे ०८ प्लास्टीकचे कॅन | ०८ नग | ५०/- |
| ४ | एक इंच रुंदीचा ३० फुट लांबीचा प्लास्टीकचा पाईप | १ नग | ४५/- |
| ५ | एक नग पांढऱ्या रंगाचे प्लास्टीकचे नरसाळे | १ नग | २०/- |
| | एकूण | | १,००,७१५/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १०/०४/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १०/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस यलोगेट पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. एन. आर. अंबुपे हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्रमांक ३ अन्वये वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांचेवतीने लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस एकविरा आई या बोटीचे मालक श्रीमती कविता महेंद्र कोळी यांनी उपस्थित राहुन वाचावे क्र. ४ अन्वये त्यांचे लेखी निवेदन सादर केले. तसेच महेंद्र हरी कोळी हे सुनावणीस उपस्थित राहीले. परंतु त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही. सुनावणीच्या वेळी श्रीमती कविता महेंद्र

कोळी यांनी जप्त असलेल्या बोटीमधील डिझेलचा साठा हा समुद्रामधील बार्जवाल्यांकडून पैसे न देता घेतल्याचे सांगुन सदर डिझेलच्या मोबदल्यात बार्जवाल्यांना मासे दिल्याचे सांगितले. सदरची चुक त्यांच्याकडून पुन्हा होणार नाही तसेच यानंतर बोटीसाठी लागणारा डिझेल ते रितसर पंपवाल्यांकडून घेणार असल्याचे सांगुन बोट जप्त असल्याने त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असल्याचे सांगितले.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखुन ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक १०/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित यलोगेट पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. एन. आर. अंबुपे यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांचे वतीने सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्हयातील आरोपीताकडे त्याच्या अटकेनंतर चौकशी केली असता, त्याच्या ताब्यातुन हस्तगत केलेला पेट्रोलजन्य पदार्थ डिझेल हे नक्की त्याने कोणाकडून प्राप्त केले व त्याची विल्हेवाट तो कशाप्रकारे लावणार आहे याबाबत माहिती मिळुन आलेली नाही. यावरुन त्याने चोरीच्या मार्गाने मिळविलेले डिझेल त्याची विक्री करुन नफा कमावण्याच्या उद्देशाने प्राप्त केले असावे याबाबत खात्री वाटते. सदर बोटी संबंधाने चौकशी करता, गुन्हयात वापरलेली बोट ही त्याची पत्नी नामे सौ कविता महेंद्र कोळी हीच्या नावाने रजिस्ट्रार ॲन्ड पोर्ट ऑफिसर, मोरा ग्रुप ऑफ पोर्ट, ठाणे यांच्याकडे एमएफबी एकविरा आई या नावाने नोंदणी क्र. आयएनडी-एमएच-१-एमएम-३०६७, दिनांक १०/०२/२०१० अन्वये नोंदणी करण्यात आली असल्याचे दिसुन आले. त्याचप्रमाणे समुद्रामध्ये मासेमारी करण्यासाठी त्यांना मा. उप आयुक्त, पशुपालन डेरी आणि मत्सव्यवसाय विभाग, कृषी मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून त्यासंदर्भातील ओळखपत्र मिळाले आहे असे निष्पन्न झाले आहे. तरी सदर बोटीचा वापर यापुढे पुन्हा डिझेल चोरीसारख्या अवैध धंद्याकरीता होवू नये या दृष्टीने सदर बोटीबाबत आदेश होण्यास विनंती आहे. त्याचप्रमाणे जप्त केलेल्या डिझेल संदर्भात आपल्या यंत्रणेमार्फत योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याची विनंती असल्याचे नमुद आहे.

दिनांक १०/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस, एकविरा आई बोटीचे मालक श्रीम. कविता महेंद्र कोळी यांनी युक्तीवाद केला की, यलोगेट पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र. ०९/२०१३, या गुन्हयाने त्यांची बोट जप्त करण्यात आलेली आहे. सदर बोटीवर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत आहे. सदरची बोट दिनांक १९/०३/२०१३ पासुन पोलिसांच्या ताब्यात असल्यामुळे त्यांचा मासेमारीचा व्यवसाय बंद आहे. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. तरी सदरची बोट त्यांना परत द्यावी अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले आहे.

0005

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन, आरोपी/अपचारी यांचे निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १८/०३/२०१३ रोजी रात्री २१:०० वाजता सीआयएसएफच्या मुंबई पोर्ट ट्रस्ट युनिटमधील उप-निरीक्षक नामे अनिल कुमार रिषाल सिंग सागरी गस्तीकामी पुरविण्यात आलेली 'तरंगिनी' या गस्ती नौकेतून स्टाफसह सागरी गस्त घालीत असताना दिनांक १९/०३/२०१३ रोजी पहाटे ०२:०० वाजण्याचे सुमारास त्यांना जवाहरद्विप येथील जेटी क्र. ४ जवळील समुद्र परिसरात एक लहान बोट संशयितरीत्या फिरत असताना आढळली. म्हणून त्यांनी सदर बोटीस थांबवून बोटीची तपासणी केली असता, त्या बोटीवर सुमारे ६० ते ७० काळ्या रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये डिझेलचा साठा आढळून आला. म्हणून त्यांनी बोटीवर हजर असलेल्या इसमाकडे त्याबाबत चौकशी केली असता, सदर डिझलेच्या साठ्याबाबत त्याचेकडे काहीही कागदपत्रे मिळून आली नाहीत. म्हणून सदर इसमास ताब्यात घेऊन त्याची बोट तरंगिनी या बोटीने टोचन करुन मुंपोट्रमधील व्हिक्टोरिया डॉक येथील केएलएम जेटी या ठिकाणी आणून उभी केली असल्याची माहिती यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांना दिल्यावरुन त्यांचेसह सदर व्हिक्टोरिया डॉक येथील केएलएम जेटीवर जावुन सदर ताब्यात घेतलेल्या बोटीची तपासणी केली व सदर इसमाकडे चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव महेंद्र हरी कोळी असे असल्याचे सांगून तो मोरा गावचा रहिवाशी असल्याची त्याने माहिती दिली. तसेच त्याच्या ताब्यातील बोटीचे नाव एकविरा आई असे असल्याचे सांगून सदर बोट त्याची पत्नी सौ. कविता महेंद्र कोळी हिचे नावावर असल्याची त्याने सांगितले. सदर बोटीवर असे एकूण ६८ प्लास्टीकच्या कॅनची तपासणी केली असता, त्यामध्ये एकूण १८९० लिटर डिझेल असल्याचे आढळून आले. नमूद इसमाकडे सदर डिझेल साठ्याविषयी विचारणा केली असता, त्याचेकडे त्या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे नसल्याचे आढळून आल्याने नमुद आरोपीत इसम नामे महेंद्र हरी कोळी याने त्याच्या ताब्यातील एकविरा आई या बोटीमध्ये वरीलप्रमाणे बेकायदेशिर वाहतुक करण्याकरीता अवैध डिझेलचा साठा केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर इसमास त्याचे ताब्यातील वर नमूद मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला. सदर माल त्याने कोठून आणला याबाबत पंचांनी त्याला विचारले असता त्याने सांगितले की, एका जहाजास मासळी दिली असता त्याचे बदल्यात त्यांनी नमूद डिझेलसारखे तेल त्याला दिले. अशाप्रकारे इसम नामे महेंद्र हरी कोळी याने त्याच्या लाकडी बोटीत १८९० लिटर इतका ज्वलनशिल पदार्थ डिझलचा अवैध साठा करुन हयगयीने आपल्या कब्जात बाळगल्याने, पर्यायानी त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन नमुद मुद्देमाल जप्त करण्यात आला.

एकविरा आई बोटीचे मालक श्रीमती कविता महेंद्र कोळी यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तीवादात, जप्त असलेल्या बोटीमधील डिझेलचा साठा हा समुद्रामधील बार्जवाल्यांकडून पैसे न देता घेतल्याचे सांगुन सदर डिझेलच्या मोबदल्यात बार्जवाल्यांना मासे दिल्याचे सांगितले. सदरची चुक त्यांच्याकडून पुन्हा होणार नाही तसेच यानंतर बोटीसाठी लागणारा डिझेल ते रितसर पंपवाल्यांकडून घेणार असल्याचे सांगुन बोट जप्त असल्याने त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असल्याचे सांगितले. सदर गुन्हा नोंद प्रकरणी पोलिस पथकाने जप्त केलेला डिझेलचा साठा हा महेंद्र हरी कोळी या आरोपीने रितसर परवानाधारकाकडून न घेता गैरमार्गाने मिळविला असल्याचे व अनधिकृत साठवणूक केल्याचे सद्य:स्थितीत सकृतदर्शनी दिसून येते. तसेच पोलीसांनी केलेल्या खुलाशात, सदर गुन्हयातील आरोपीताकडे त्याच्या अटकेनंतर चौकशी केली असता त्याच्या ताब्यातुन हस्तगत केलेला पेट्रोलजन्य पदार्थ डिझेल हे नक्की त्याने कोणाकडून प्राप्त केले व त्याची विल्हेवाट तो कशाप्रकारे लावणार आहे याबाबत माहिती मिळुन आलेली नाही. यावरुन त्याने चोरीच्या मार्गाने मिळविलेले डिझेल त्याची विक्री करुन नफा कमावण्याच्या उद्देशाने प्राप्त केले असावे याबाबत खात्री वाटते असे सांगितले. सदर बाबत आरोपीने सुमारे ६३ कॅनमधुन १८९० लिटर डिझेलचा साठा हा समुद्रामध्ये गैरमार्गाने हस्तगत केल्याचे दिसुन येते. आरोपीतांनी दिलेल्या जबाबानुसार त्यांचा मासेमारीचा व्यवसाय असल्याचे सांगितले आहे. तथापी, मासेमारीच्या व्यवसायाकरीता आवश्यक असणाऱ्या डिझेलच्या साठयाची कमी प्रमाणात गरज असुन सदर गुन्हा नोंद प्रकरणी पोलिसांनी जप्त केलेल्या डिझेलच्या साठयाचे परिमाण पहाता सदरचा साठा हा मासेमारीसाठी बोटीकरीता वापरण्यासाठी धारण केला नसुन तो बेकायदेशिररित्या विक्री करीता हस्तगत केल्याचे निष्पन्न होत आहे. सदर बोटीमध्ये डिझेल हा पेट्रोलजन्य पदार्थ ज्वलनशिल असल्याचे माहित असून सुध्दा स्वत: जवळ विनापरवाना बाळगला व ज्वालाग्राही पदार्थामुळे मानवी जिवितास पोहचण्याऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करण्याची जाणीवपूर्वक हयगय केली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. सबब, जप्त करण्यात आलेला डिझेलचा संपूर्ण अवैध साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेली एकविरा आई बोटीचे मालक श्रीमती कविता महेंद्र कोळी यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, सदर बोटीवर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत आहे. सदरची बोट दिनांक १९/०३/२०१३ पासुन पोलिसांच्या ताब्यात असल्यामुळे त्यांचा मासेमारीचा व्यवसाय बंद आहे. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. तरी सदरची बोट त्यांना परत द्यावी, अशी विनंती केली.

तथापी, तपासी पोलिस अधिकारी यांनी केलेल्या खुलाशात, गुन्हयात वापरलेली बोट ही आरोपी महेंद्र हरी कोळी याच्या पत्नी नामे सौ कविता महेंद्र कोळी हीच्या नावाने रजिस्ट्रार ॲन्ड पोर्ट ऑफिसर, मोरा ग्रुप ऑफ पोर्ट, ठाणे यांच्याकडे एमएफबी एकविरा आई या नावाने नोंदणी क्र. आयएनडी-एमएच-१-एमएम-३०६७, दिनांक

१०/०२/२०१० अन्वये नोंदणी करण्यात आली असल्याचे दिसुन आले. तरी सदर बोटीचा वापर यापुढे पुन्हा डिझेल चोरीसारख्या अवैध धंद्याकरीता होवू नये या दृष्टीने सदर बोटीबाबत आदेश होण्यास विनंती केली. बोटीचे मालक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, सदरची बोट नोंदणी क्र. आयएनडी-एमएच-१-एमएम-३०६७, दिनांक १०/०२/२०१० अन्वये रजिस्ट्रार ॲन्ड फोर्ट ऑफिसर, मोरा यांचेकडे दिनांक २८/०१/२०१३ रोजी नोंदणीकृत असल्याचे दिसुन येते. श्रीम. कविता महेंद्र कोळी यांच्या नांवे मोरा कोळीवाडा, तालुका उरण, जिल्हा रायगड या पत्यावर एमएफबी एकविरा आई या नावांची लाकडी बोट मासेमारीकरीता नोंदणी करण्यात आल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसुन येत आहे. महेंद्र हरी कोळी यांनी मासेमारीच्या नावे त्याच्या ताब्यातील बोटीसाठी डिझेलच्या साठयाची आवश्यकता असल्याकारणाने त्याने बार्जवाल्यांकडून डिझेलचा साठा खरेदी केल्याचे सांगुन या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभुल केल्याचे दिसुन येते. वास्तविकपहाता सदरचा मोठया प्रमाणावर हस्तगत केलेला डिझेलचा साठा महेंद्र हरी कोळी याने अवैध विक्री करण्यासाठी धारण केल्याचे तसेच बोटीचे मालक हे जाणिवपुर्वकरित्या सदरच्या गैरकृत्यामध्ये त्यांची संमती असल्याचे सिध्द होत आहे. सबब, सदर बोटीचा ज्वलनशिल पेट्रोलियम पदार्थाच्या अवैध खरेदी, साठवणुक, विक्री व वाहतुकीसाठी वापर केल्याचे सिध्द होत असल्याने जप्त करण्यात आलेली एकविरा आई ही लाकडी बोट शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०९/२०१३ दिनांक १९/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

NG & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
D OFFICE
UMBAI

**आदेश :-**

१) जप्त करण्यात आलेली एकविरा आई ही लाकडी बोट शासनजमा करण्यात येत आहे. सदर बोटीच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास बोटीचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची बोट त्याच्या मालकास परत करण्यात यावी व सदर रक्कम शासनजमा करावी.

२) अथवा बोटीचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या बोटीची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची बोट लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) जप्त करण्यात आलेल्या एकविरा आई या बोटीमधील ६३ प्लॅस्टिकचे कॅनमधील संपूर्ण १८९० लिटर डिझेलचा साठा, पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) जप्त करण्यात आलेले रिकामे होणारे ६३ प्लॅस्टिकचे कॅन तसेच ८ रिकामे प्लॅस्टिकचे कॅन असे एकुण ७१ प्लॅस्टिकचे कॅन, एक इंच रुंदीचा ३० फुट लांबीचा प्लास्टिकचा पाईप, १ नग पांढऱ्या रंगाचे प्लास्टिकचे नरसाळे इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) महेंद्र हरी कोळी
२) एकविरा आई या बोटीचे मालक सौ. कविता महेंद्र कोळी
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस ठाणें, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
- 370 -
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.